ज्योतिषविषयक

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com

DIRECT ADMISSION

MBBS | MD | MS | BDS | MDS

BAMS | BUMS | BHMS

PANCHAKARMA

DERMATOLOGY | NURSING

PHARMACY

PHYSIOTHERAPY

PARAMEDICAL | VETERINARY

OPHTHALMOLOGY | FMGE

Indo Abroad Education

9326134770

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १८५ वा | मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# सोलापूर जिल्ह्यात अवकाळी वादळी वाऱ्यासह पाऊस

## ज्वारी, गहूसह द्राक्ष बागा उन्मळून पडल्या, पावसाने पिकाचे नुकसान



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. सोमवारी दुपारी चार नंतर अनेक ठिकाणी मुसळधार तर काही ठिकाणी पावसाने हजेरी लावली. जिल्ह्यातील मंद्रूप, भंडारकवठे, मैंदर्गी, मंगळवेढा या ठिकाणी पावसाने दमदार हजेरी लावली.

या पावसाने हाता तोंडाशी आलेल्या पिकांचे नुकसान झाले. दरम्यान, वादळी वाऱ्याने अनेक ठिकाणी वातावरणात बदल झाला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार सोलापूर जिल्ह्यातील काही भागात वादळी वाऱ्यासह पावसाने जोरदार हजेरी लावली.जिल्ह्यात गेले काही दिवस उन्हाचा कडाका वाढला होता.दिवसभर कडक उन्ह तर पहाटे हवेत गारवा जाणवत होता. सोमवारी सकाळपासून आकाश निष्प्रभ्र होतं. दुपार नंतर काही ठिकाणी पावसाने अचानक हजेरी लावली. सुरवातीला सोसाट्याचा वारा आला. त्यानंतर मेघगर्जना सह पावसाने हजेरी लावली. जिल्ह्यातील मंद्रूप, मैंदर्गी, भंडारकवठे, लवंगी, मंगळवेढा या ठिकाणी पाउस पडल्याची वार्ता आहे.मंद्रूप, मैंदर्गी येथील काही ठिकाणी गारांचा पाउस पडला.तर काही ठिकाणी सोसाट्याचा वाऱ्यासह मुसळधार पाउस पडला.

काही ठिकाणी दीड ते दोन तास पावसाची रिपरिप सुरू होती.तसेच सोसाट्याचा वारा सुटल्याने पिकांचे मोठे नुकसान झाले.आंब्याचा मोहर गळून पडला.तर काढणीला आलेला द्राक्षाच्या पिकाचे नुकसान झाले. मंगळवेढा परिसरात ज्वारी, गहू पिकांचे नुकसान झाले. तसेच सानोग्ला तालुक्यात काही ठिकाणी हलका पाउस पडला. त्यामुळे डाळींब पिकावर रोग पसरण्याची भीती शेतकर्यांवर आली आहे.

जिल्ह्यात अवकाळी पावसाने हातात तोंडाशी आलेले पीक निघून गेला आहे. या पावसाने नागरिकांसह परीक्षार्थी विद्यार्थ्यांची तारांबळ उडाली आहे.दरम्यान, सोलापूर जिल्ह्यात गेल्या काही दवसा पासून उन्हाचा कडाका वाढला होता. दुपारी घामाच्या धारा लागत होत्या. शहरात देखील दुपारी चार नंतर वाऱ्याचे वेग प्रचंड होता. तसेच ढग दाटून आले होते पंढरपुरात देखील अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. असे असले तरी अवकाळी पावसाने पुन्हा एकदा बळीराजाला संकटात टाकले आहे.

**वैराग भागाला अवकाळीचा फटका**

वैराग परिसरातील दहिटणे, मुंगशी, तडवळे, ढोराळे, यावली, सासुरे इलेवाडी आदी गावातील द्राक्ष बागासह गहू , ज्वारी, हरभरा आदी पिकांना अवकाळीचा तडाका बसला आहे. यामुळे शेतकऱ्याला मोठी आर्थिक नुकसान सोसावे लागणार आहे.

यावर्षी अतिवृष्टीने अगोदरच घायाळ झालेला बळीराजा या अवकाळीने दुहेरी संकटात सापडला आहे.

द्राक्षबागांना तर महागडी खते, औषधे, तसेच छाटणी, फवारणी, रोजगार याचा भयानक खर्च झाला आहे. शेतकऱ्यांनी आपल्या तळहाताच्या फोडाप्रमाणे आपली पिके उभा केली होती. परंतु या खराब वातावरणामुळे व अवकाळी मुळे अक्षरशः बळीराजाच्या स्वप्नाचा चिखल झाल्याचे पहायला मिळत आहे. वाढत्या महागाईने अगोदरच शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असून निदान पिकांना जोपासन्यासाठी केलेला खर्च तरी निघेल का ? ह्याच चिंतेत शेतकरी पडला आहे.

अतिवृष्टीची तुटपुंजी रक्कम देऊन शेतकऱ्यांना शासनाने ही निवडणूकीच्या तोंडावर पिक विमा देण्याचे आश्वासन दिले मात्र निवडणूका पार पडल्या तरीही शेतकऱ्यांच्या खात्यावर पिक विम्याचे पैसे जमा झाले नाहीत. या निमित्ताने बळीराजाच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम सरकारने केले आहे. त्यामुळे या अस्मानी संकटातून सावरायचे कसे हा मोठा प्रश्न शेतकऱ्यां समोर उभा आहे.

> यावर्षी पाऊस कमी प्रमाणात पडणार असून परतीचा पाऊस चांगला होईल सोलापूर जिल्ह्यात एक मार्चपर्यंत वातावरण खराब राहील एक मार्चपासून उष्णता वाढण्याची शक्यता आहे तरी काढणीला आले ली पिके काढून घ्यावीत. - महावीर क्षीरसागर, द्राक्ष उत्पादक शेतकरीया वर्षी पावसाळ्यात अतिवृष्टीचा तडाका शेतकऱ्यांना बसला आहे त्यामुळे शेतकरी अगोदरच कर्जबाजारी झाला असून त्यात पिक हातात येण्याच्या अगोदर ढगाळ वातावरणा सह अवकाळीचा फटका शेतकऱ्यांना बसला आहे
>
> **- डॉ. पंजाबराव डक,** हवामानतज्ञ

## सोलापूरात संजीवनी कॉर्पोरेट प्रीमियर लीगचे आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** येथील संजीवनी सोशल फाउंडेशन तर्फे दर वर्षी संजीवनी कॉर्पोरेट प्रीमियर लीग ही भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात येते. यंदाच्या वर्षी ही स्पर्धा २७, २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष राकेश उदगिरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ही स्पर्धा दयानंद कॉलेज क्रिकेट स्टेडियम येथे आयोजित करण्यात आले आहे या स्पर्धेत क्टअ, आवसार पतसंस्था, सोलापूर श्रमिक पत्रकार संघ, NIMA, जोडभावी पेठ पोलिस, सोलापूर केमिस्ट, RK CC, वैद्यकीय प्रतिनिधी, इंजिनियर्स, रोटरी क्लब, सोलापूर ॲडव्होकेटस आणि टीचर्स असे एकूण १२ संघ सहभागी होणार




आहेत. प्रत्येक संघात १५ खेळाडू असणार आहेत. ही स्पर्धा लीग पद्धतीची असणार असून या तीन दिवसीय स्पर्धेत प्रत्येक संघातील खेळाडू आपले क्रिकेट चे उत्तम प्रदर्शन करून जिंकण्याचा प्रयत्न करणार आहेत.

निसर्ग संवर्धन हेतू ह्या स्पर्धेदरम्यान जितकेही षटकार लगावले जातील व गडी बाद होतील, ह्या प्रत्येक वेळेस १ झाड लावण्यात येईल, असे एकूण ४०० हून अधिक चांगल्या प्रतीचे फळझाडे लावून एक बाग संजीवनी सोशल फाउंडेशन तर्फे विकसित करण्याचे नियोजन आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन दि. २७ फेब्रुवारी सकाळी ९:३० वाजता होणार असून बक्षीस वितरणाचा कार्यक्रम १ मार्च रोजी दुपारी ३ वाजता होणार आहे.

तसेच लकी ड्रॉ च्या माध्यमातून दि. ०१ मार्च २०२६ रोजी अंतिम सामन्यानंतर मैदानात उपस्थित प्रेक्षकांसाठी विविध प्रकारचे आकर्षक भेट वस्तू देखील देण्यात येणार आहे. जे की उपस्थितांसाठी एक प्रमुख आकर्षण असणार आहे.ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी फाउंडेशन चे अध्यक्ष राकेश उदगिरी, सचिव सचिन गबुरे, संचालक गिरीष सुकलेचा, सदस्य अमोल शेट्टी व आयोजन समिती चे सदस्य सतीश सुरवसे, आनंद खमितकर, मयूर बासुतकर, बिरोबा सलगर, नरेंद्र दंतकाळे, सिद्धराम तंबाके, विकास संघानी, सचिन गायकवाड, करण चाकोते इत्यादी परिश्रम घेत आहेत.

या पत्रकार परिषदेला आनंद खमितकर, अमित काबणे, सतीश सुरवसे, सिद्धाराम तंबाके, बिरोबा सलगर, विकास संघानी, चंद्रशेखर उदगिरी, अमोल शेट्टी आदी उपस्थित होते.

## माळशिरस पंचायत समितीचा वरिष्ठ सहाय्यक ५,000 रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडला

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** तक्रारदार यांनी पूर्ण केलेल्या सभामंडपाच्या कामाचे ह्यपूर्णत्वाचा दाखलाह्न देण्यासाठी १०,००० रुपयांच्या लाचेची मागणी करून, तडजोडीअंती ५,००० रुपये स्वीकारणाऱ्या माळशिरस पंचायत समितीच्या वरिष्ठ सहाय्यकास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) आज रंगेहात पकडले.




सुंदरराव उत्तम नागटिळक (वय ५६ वर्षे) वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती, माळशिरस. टाकळी रोड, पंढरपूर.या प्रकरणातील तक्रारदार यांनी एका सभामंडपाचे काम पूर्ण केले होते. या कामाचे अधिकृत कंम्पीशन सर्टिफिकेट मिळवण्यासाठी त्यांनी पंचायत समितीकडे पाठपुरावा केला होता. हे सर्टिफिकेट देण्यासाठी आरोपी लोकसेवक सुंदरराव नागटिळक यांनी तक्रारदाराकडे १०,००० रुपये लाचेची मागणी केली होती.

तक्रारदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर यांच्याकडे तक्रार नोंदवली. प्राप्त तक्रारीची पडताळणी केली असता, नागटिळक यांनी १०,००० रुपयांची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आणि तडजोडीअंती ५,००० रुपये स्वीकारण्याचे मान्य केले.लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने माळशिरस येथे सापळा रचला. ठरल्याप्रमाणे ५,००० रुपयांची लाच स्वीकारताना सुंदरराव नागटिळक यांना पथकाने रंगेहात पकडले. त्यांच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

**आवाहनः** कोणत्याही शासकीय कामासाठी कोणाही लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

## महावितरणच्या मनमानी धोरणामुळे पी. एम. सौरघर योजनेचा ग्राहकांना फटका

### पोर्टलवरील मंजुरी ग्राहकांच्या मागणीनुसार करण्याची सोलर असोसिएशनची मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रात महावितरणच्या मनमानी धोरणामुळे पी. एम. सौरघर योजनेच्या ग्राहकांना फटका बसत आहे. हे टाळण्यासाठी महावितरण पोर्टलवरील सौर-सिस्टीमची मंजुरी ग्राहकांच्या मागणीनुसार करण्यात आली, अशी मागणी सोलार असोसिएशन ऑफ सोलापूरचे अध्यक्ष गिरीश तिवारी यांनी पत्रकार परिषदेत केली.

महावितरणकडून अंमलात आणण्यात आलेल्या चुकीच्या नव्या धोरणात्मक बदलांमुळे राज्यातील जवळपास 100 टक्के निवासी सोलर ग्राहकांवर प्रतिकूल परिणाम होणार आहे. १३ फेब्रुवारीपासून पीएम सूर्यघर योजनेअंतर्गत सोलर क्षमतेच्या मंजुरीसंदर्भात बदल करण्यात आल्याने अनेक ग्राहकांना अपेक्षित क्षमतेची सोलार परवानगी मिळत नाही. पूर्वीच्या नियमांनुसार ग्राहकांना त्यांच्या वीज वापराच्या गरजेनुसार सोलर प्रकल्प उभारण्याची मुभा होती. मात्र नव्या नियमांनुसार ग्राहकांच्या मागील १२ महिन्यांच्या सरासरी वीज वापरावर आधारित मर्यादित क्षमतेलाच मंजुरी दिली जात आहे. परिणामी ज्या व्याहकांनी सोलार सिस्टमसांठी ऑर्डर दिलेले आहेत त्यांपैकी ९० टक्क्यांहून अधिक ऑर्डर प्रलंबित होतील.

संघटनेच्या मते, महाराष्ट्रातील वीज दर तुलनेने जास्त असल्याने ग्राहक सोलर पर्यायांकडे वळत आहेत. घरांमध्ये एसी, इलेक्ट्रिक वाहन, इंडक्शन कुकर, आधुनिक उपकरणे यांचा वापर वाढत असून भविष्यातील गरजा लक्षात




घेऊन ग्राहक जास्त क्षमतेचे सोलर प्रकल्प बसवू इच्छितात. मात्र सध्याच्या मयदिमुळे त्यांना आवश्यक त्या प्रमाणात वीज निर्मिती करता येणार नाही.

विशेष म्हणजे, केंद्र सरकारच्या पीएम सूर्यघर योजनेअंतर्गत MNRE कडून १० किलोवॅटपर्यंत ऑटो लोड एक्स्टेंशनची सवलत दिली गेली असताना महाराष्ट्रात त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नसल्याची तक्रार संघटनेने केली आहे. त्यामुळे सोलर मंजुरीची गती मंदावली असून उद्योग व व्यावसायिक क्षेत्रालाही याचा परिणाम होत आहे.

अशाप्रकारे केंद्रसरकारच्या पी. एम. सौरघर योजनेचे हे खच्चीकरण महाराष्ट्रात चालू आहे अतिरिक्त वीज निर्मिती झाल्यास ती आर्थिक वर्षाच्या अखेरीस डिस्कॉमकडे जमा करून, त्याचे समायोजन किंवा मोबदला दिला जातो. त्यामुळे ही व्यवस्था ग्राहकांसाठी तोट्याची नसून दोघांसाठी ही फायदेशीर आहे.

नव्या नियमांमुळे ग्राहकांच्या प्रलंबित अर्जावर परिणाम होईल, तसेच सोलर विक्रेत्यांचा व्यवसाय गंभीरपणे बाधित होईल. राज्यात पीएम सूर्यघर योजनेअंतर्गत दरमहा सुमारे ५० हजार घरे सोलर स्वीकारत असून देशातील एकूण सोलर स्वीकृतीत महाराष्ट्राचा सुमारे २५ टक्के वाटा आहे. नव्या धोरणामुळे हा वेग मंदावण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

यामुळे सोलार वेंडर्स कर्जबाजारी व दिवाळखोर होतील, लाखोंच्या संख्येने युवक बेरोजगार होतील. सद्यस्थितीमध्ये ग्राहकांनी बुकींग केलेले ऑडर्स मोठ्या प्रमाणात अडकून राहतील. या बदलांमुळे बँकींग इन्स्टिटयूटवरदेखिल परिणाम तसेच महाराष्ट्राला मिळणारे महसूल कमी होणार आहे. या आदेशामुळे संघटनेने कामबंद आंदोलन सुरू केले. हे लक्षात घेता संबंधित आदेश तात्काळ मागे घेवून महावितरण पोर्टलवरील सौर-सिस्टीम मंजूरी ही ग्राहकांच्या मागणीनुसार असावी अशी मागणी दोन्ही संघटनांतर्फे करण्यात आली. मागणीची दखल न झाल्यास राज्यव्यापी आंदोलन करण्याचा इशारा या संघटनांनी दिला आहे.

पत्रकार परिषदेस शशिकांत जमादार, बाबूलाल शेख, गुरुराज कुलकर्णी आदी उपस्थित होते.

## अशोक चौक ते पाथरूट चौक रस्ता मोकळा !

### मनपाची धडाकेबाज कारवाई, अनधिकृत खोकी जमीनदोस्त



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील वाहतुकीला अडथळा ठरणारी अतिक्रमणे हटवण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेने आता कंबर कसली आहे. आज सकाळी अशोक चौक ते पाथरूट चौक या मार्गावर महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने धडक कारवाई करत रस्त्यावरील अनधिकृत खोकी आणि शेड जमीनदोस्त केले.

सोलापूर शहर पोलीस दलाच्या चोख बंदोबस्तात ही मोहीम पार पडली. अशोक चौक ते पाथरूट चौक हा भाग रहदारीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र, गेल्या काही काळापासून या रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात कच्ची व पक्की खोकी उभारण्यात आली होती. यामुळे पादचाऱ्यांना चालणे कठीण झाले होते आणि वाहनधारकांना सतत वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत होता.

VNP MOTORS

Multi Brand Car Sales & Services

सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप

OFFER

पेट्रोल कार: SYNTHETIC OIL सर्व्हिस फक्त ₹2949/-

डिजेल कार: SYNTHETIC OIL सर्व्हिस फक्त ₹3649/-

AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-

FREE PICK-UP & DROP

CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center

8000-92-8007

VNP MOTORS Pvt. Ltd.

Exclusive showroom of Second Hand Car Sales & Service

GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

## मोहोळमध्ये स्थापन करण्यात आला छत्रपती संभाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा

### रविवारी सकाळ नंतर कौशल्याने हाताळली पोलीस प्रशासनाने परिस्थिती

### वरिष्ठ स्तरावरील मार्गदर्शन घेऊन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण घेणार निर्णय

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ -पंढरपूर -आळंदी पालखी महामार्गाच्या प्रवेशद्वारा समोर बसस्थानका लगत असलेल्या सुरक्षित जागेत मोहोळ मधील शंभूप्रेमी युवकांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूणार्कृती पुतळ्याची स्थापना करून रविवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास त्याचे विधिवत पूजन करण्यात आले. परवानगीशिवाय या पुतळ्याची स्थापना झाल्याची बाब प्रशासनाच्या लक्षात येताच या ठिकाणी तहसीलदार सचिन मुळीक, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर, पोलीस निरीक्षक बाजीराव पोवार, यांनी तात्काळ भेट दिली. सकाळपासूनच मोहोळ पोलीस प्रशासनाने या ठिकाणी चोख बंदोबस्त नियुक्त करत वरिष्ठ प्रशासकीय स्तरावरून आवश्यक त्या स्वरूपात मार्गदर्शन घेतले. त्यामुळे काही काळ का होईना या परिसरात नागरिकांची मोठी गर्दी होऊन तणावपूर्ण शांततेचे स्वरूप प्राप्त झाले होते. आता प्रशासन पोलीस बंदोबस्तात पुतळा काढणार अशा चर्चांना उधाण आल्यामुळे शहर आणि तालुक्यातील शेकडो युवक या ठिकाणी हळूहळू जमा होऊ लागले होते,मात्र उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर,पोलीस निरीक्षक बाजीराव पवार, सपोनी नितीन आतकरे,सपोनी किरण पाटील यांच्या माध्यमातून पोलीस प्रशासनाने शांततेचे आवाहन करत प्रशासकीय स्तरावरून दिलेल्या सूचनांचे पालन करण्याबाबतच्या सूचना सर्वांना दिल्यानंतर सर्वांनी प्रशासनाच्या सुंचनाचा आदर करत सहकार्य करण्याचे अभिवचन दिल्यानंतर प्रशासन आणि शंभू प्रेमी युवक यांच्यामधील अप्रत्यक्ष सुरू झालेला (पान 2 वर..)

> परवानगी न घेता पुतळ्याची स्थापना झाल्याने प्रशासनास अशा घटनेनंतर आवश्यक ती पूर्व दक्षता घेणे क्रमप्राप्त असते. या दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण झाला नाही.ज्या ठिकाणी या पुतळ्याची स्थापना करण्यात आली आहे ती जागा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या पंढरपूर उपविभागाच्या कक्षेत येते.त्यामुळे याबाबत सदर प्रशासकीय कार्यालयास त्वरीत अवगत करण्यात आले आहे. याबाबत सदर विभागाचे वरिष्ठ प्रशासकीय मार्गदर्शन आल्यानंतर संबंधित विभाग निर्णय घेणार आहे. दरम्यान या पुतळ्याच्या सुरक्षिततेसाठी या ठिकाणी पोलीस बंदोबस्ताबरोबर संरक्षक बॅरिगेटिंग देखील करण्यात आले आहे. या घटनेवरून शहरातील सर्वधर्मसमभाव आणि जातीय सलोखा याला कुठेही तडा जाऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाने बैठक घेत सर्वतोपरी प्रयत्न करत सर्वांना शांततेचे आवाहन केले. या दरम्यान सर्वांनी प्रशासकीय सूचनांचा आदर केल्यामुळे कोणताही अनुचित प्रकार या दरम्यान घडला नाही.
>
> **- बाजीराव पोवार,** पोलीस निरीक्षक मोहोळ



## संपादकीय

# एपस्टिनचे धक्के

कुविख्यात उद्योजक, अमेरिकेतील बाललैंगिक प्रकरणातील गुन्हेगार जेफ्री एपस्टिन प्रकरणामुळे विविध देशांत सनसनाटी निर्माण झाली आहे. अनेक बड्या सेलेब्रिटीजना तसेच उद्योगपती आणि नेत्यांना त्याची किंमत मोजावी लागत आहे.

अल्पवयीन मुलींची तस्करी करून त्याने अनेकांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. त्याच्या बेटावर बड्या व्यक्तींना बोलावून हे कुकर्म केले जात असे. त्याची मैत्रीण गिलीन मॅक्सवेल हिला पाच वर्षांपूर्वी मुलींच्या तस्करी प्रकरणात दोषी ठरवले होते.

एपस्टिनचा 2019 मध्ये तुरुंगात संशयास्पद मृत्यू झाला. त्यानंतर एपस्टिन प्रकरणाशी संबंधित कागदपत्रे म्हणजेच 'एपस्टिन फाईल्स' सार्वजनिक करण्याची मागणी सुरू झाली. अमेरिकेच्या न्याय विभागाने त्या खुल्या केल्या असून, त्यामध्ये अल्पवयीन मुलींच्या लैंगिक शोषणाशी संबंधित 30 लाख कागदपत्रे आणि व्हिडीओंचा समावेश आहे. या फाईल्समधून अनेकांची नावे समोर येत आहेत. बिटनच्या राजघराण्यातील किंग चार्ल्स तिसरे यांचे धाकटे बंधू अँड्र्यू माऊंटबॅटन विंडसर यांना गुरुवारी बिटिश पोलिसांनी अटक केली.

एपस्टिनशी संबंध असल्याच्या आरोपानंतर सरकारी कार्यालयांतील गैरवर्तणुकीच्या संशयावरून त्यांना अटक झाली. विशेष म्हणजे, अँड्र्यू यांच्या 66व्या वाढदिनादिवशीच त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. अँड्र्यू हे सध्या पोलिसांच्या कोठडीत असून, त्यांच्यावरील कारवाईमुळे राजघराण्याची अब्रू चव्हाट्यावर आली आहे. अँड्र्यू हे दशकापूर्वी वाणिज्य राजदूत होते. त्यांच्यावर झालेल्या आरोपांविषयी बोलताना कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही. महिला आणि मुलींविरोधात हिंसक घटनांबद्दल कुणालाही माहिती असेल, तर ती सांगण्यासाठी पुढे येणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, अशी सुस्पष्ट भूमिका बिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी घेतली.

बऱ्याचदा बड्या व्यक्तींना एक कायदा असतो आणि सामान्य माणसाला दुसरा, असा अनुभव येतो; परंतु बिटन हा त्याबाबतचा अपवाद असून, हे कौतुकास्पद मानावे लागेल. अमेरिकेचा न्याय विभाग प्रत्येक पान काळजीपूर्वक तपासत असून, त्यामुळे पीडितेचे नाव, ओळख आणि प्रत्येकीची कहाणी सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न आहे. अद्यापही लाखो पाने जाहीर झालेली नाहीत. कायद्यात नमूद केल्यानुसार, अमेरिकेच्या न्याय विभागाच्या अधिकाऱ्यांना पीडितांची ओळख लपवण्यासाठी किंवा सक्रिय गुन्हेगारी तपासाशी संबंधित माहिती 'रिडॅक्ट' करण्याची म्हणजेच संपादित वा सेन्सॉर करण्याची परवानगी होती; परंतु कायद्यानुसार त्यांनी ते 'रिडॅक्ट' का केले, हे सांगणे आवश्यक होते. अशी काही पाने 'रिडॅक्ट' करण्यात आली असून, त्याची कारणे स्पष्ट करण्यात आलेली नाहीत.

याबाबत डेमोक्रॅटिक पक्षाचे सदस्य रो खन्ना यांच्यासह काही नेत्यांनी पाने उघड करण्यास विलंब झाल्यास महाभियोग चालवण्याचा इशारा दिला होता. एपस्टिन फाईल्स ट्रान्स्परन्सी ॲक्टच्या विरोधात रिपब्लिकन पक्षाने मतदान करावे, अशी धक्कादायक भूमिका अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीदेखील घेतली होती. एपस्टिनने फ्लोरिडातील ट्रम्प यांच्या रिसॉर्टमध्ये 14 वर्षांच्या एका मुलीची ट्रम्प यांच्याशी ओळख करून दिली. 1990च्या दशकातील 'त्या' कथित भेटीत एपस्टिनने ट्रम्प यांना कोपराने धक्का मारत, ही मुलगी चांगली आहे ना, असा प्रश्नही विचारला; मात्र न्यायालयात तिने ट्रम्प यांच्यावर कोणताही आरोप केला नाही; परंतु एपस्टिनने अनेक वर्षे माझी फसवणूक करून अत्याचार केले, असा आरोप मात्र तिने केला.

एपस्टिनला अटक करण्यापूर्वी माजी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांचे त्याच्या सोबतचे अनेक फोटो काढले गेले होते; मात्र एपस्टिन पीडितांनी क्लिंटन यांच्यावरही कोणताही आरोप केलेला नाही आणि क्लिंटन यांनीही एपस्टिनच्या लैंगिक गुन्ह्यांची आपल्याला माहितीच नव्हती, असा खुलासा करून कानावर हात ठेवले आहेत. एपस्टिनने मायक्रोसॉफ्टचे सहसंस्थापक बिल गेटस्‌ यांना पाठवलेल्या ई-मेलमध्ये भारताचे तत्कालीन आरोग्यमंत्री डॉ. हर्षवर्धन यांचाही उल्लेख आहे.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संसदेत केंद्रीय मंत्री हरदीपसिंग पुरी यांचाही संबंध एपस्टिन फाईल्सशी जोडला होता; मात्र आपण एपस्टिनला फक्त इंटरनॅशनल पीस इन्स्टिट्यूटच्या शिष्टमंडळाचा भाग म्हणून भेटलो होतो. त्यापलीकडे आपला त्याचाशी कसलाही संबंध नव्हता, असा खुलासा पुरी यांनी केला आहे. एपस्टिनच्या शोषणाच्या जाळ्यात एक भारतीय तरुणी अडकल्याचे उघड झाले असून, अमेरिकन प्रशासन सध्या तिचा शोध घेत आहे. या तरुणीला न्याय मिळवून देण्याची जबाबदारी अमेरिकेबरोबरच भारत सरकारचीदेखील आहे. सत्ता, संपत्ती आणि प्रसिद्धी यांच्या झगमगाटामागे अनेकदा काळोख दडलेला असल्याची उदाहरणे समोर येत असतात. जे लोक समाजात आदर्श, मार्गदर्शक किंवा प्रभावशाली मानले जातात, त्यांच्याच नावांभोवती जेव्हा घोटाळे, शोषण आणि गैरवर्तनाचे आरोप फिरू लागतात, तेव्हा जनतेचा विश्वास हादरतो.

कागदपत्रांच्या पानापानांतून उघड होणारी ही धक्कादायक माहिती केवळ व्यक्तींना नव्हे, तर संपूर्ण व्यवस्थेलाच प्रश्नांच्या भोवऱ्यात ढकलते. न्याय, पारदर्शकता आणि नैतिकतेची खरी कसोटी अशाच वेळी लागते. जगभरातील बड्या धेंडांना लहान मुली पुरवून आपली कामे करून घेणे, हा उद्योग एपस्टिन करत होता आणि तो अश्लाघ्य व नीचपणाचाच होता. अशा प्रत्येक प्रकरणात दोन टोकांचा धोका असतो. एक म्हणजे प्रभावशाली व्यक्तींना कायद्यापलीकडे समजून त्यांच्यावर कारवाईच न होणे आणि दुसरे म्हणजे, अपुऱ्या किंवा अप्रमाणित माहितीच्या आधारावर कोणालाही दोषी ठरवून सार्वजनिकरीत्या बदनाम करणे; पण न्यायव्यवस्थेची खरी ताकद ही पीडितांचे संरक्षण, सत्याचा शोध आणि निःपक्ष चौकशी याच्या संतुलनात असते. लैंगिक शोषणासारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये कोणतीही तडजोड असू शकत नाही.

दोषी कोणीही असो, राजकारणी, उद्योगपती, कलाकार किंवा अधिकारी, कायद्याच्या चौकटीत त्याला शिक्षा झालीच पाहिजे. त्याचवेळी, केवळ राजकीय हेतूने किंवा सनसनाटी निर्माण करण्यासाठी नावे उचलून धरणे, हेही तितकेच घातक आहे. पारदर्शकता, जबाबदारी आणि कायद्यापुढील समानता ही मूल्ये जपली गेली, तरच पीडितांना न्याय मिळेल आणि समाजाचा विश्वास अबाधित राहील, अन्यथा घोटाळ्यांची धूळ बसल्यानंतरही संशयाची सावली मात्र दीर्घकाळ कायम राहील.

# शिक्षणातील प्रामाणिकपणा आणि नवोन्मेष : काळाची गरज

मी इयत्ता सातवीत असताना विज्ञान प्रदर्शनात भाग घेतला होता. त्या प्रदर्शनासाठी मी 'अंधश्रद्धा' हा विषय निवडला होता आणि त्या अनुषंगाने दोन प्रयोग सादर केले होते. अंधश्रद्धा निर्मूलन व्हावे आणि समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा, हा माझ्या उपक्रमांचा उद्देश होता. बुवाबाजी करणारे जसे लिंबूतून रक्त किंवा ज्वाला काढल्याचा आभास निर्माण करतात, तसेच प्रयोग मी करून दाखवत होतो. लिंबू कापताना चाकूला मिथिल ऑरेंजचे द्रावण लावत होतो; त्यामुळे लिंबातून रक्त निघाल्याचा भास होत होता. तसेच, चाकूला फॉस्फरस लावल्यावर त्यातून ठिणग्या व ज्वाला बाहेर पडत. सादरीकरणानंतर मी पाहणाऱ्यांना यामागील शास्त्रीय कारणे स्पष्ट करत होतो. त्यामुळे अंधश्रद्धेपेक्षा विज्ञानाची ताकद लोकांना समजत होती.

माझ्या शेजारी एक विद्यार्थी गतीऊर्जेचे विद्युत ऊर्जेत रूपांतर या संकल्पनेवर आधारित उपकरण घेऊन बसला होता. तो हाताने एक चक्र फिरवत असे आणि त्याच वेळी शेजारी ठेवलेला बल्ब पेटत असे. मात्र, त्याने त्यात एक चलाखी केली होती, जी परीक्षकांनी ओळखली. त्याने पायाजवळ एक बटन ठेवले होते आणि ते दाबल्यावरच बल्ब लागत होता. हाताने फिरवलेल्या चक्राचा आणि पेटणाऱ्या बल्बचा प्रत्यक्षात काहीही संबंध नव्हता. अशा प्रकारे विज्ञान प्रदर्शनात फसवणूक करून बक्षीस जिंकण्याचा त्याचा प्रयत्न होता; परंतु सुज्ञ परीक्षकांनी त्याला प्रदर्शनातून बाहेर काढले.

अशीच काहीशी घटना मागील आठवड्यात दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय एआय परिषदेत घडली. गलगोटिया युनिव्हर्सिटी या विद्यापीठाने आपल्या स्टॉलमध्ये सादर केलेला रोबोटिक डॉग हा त्यांच्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स'मध्ये विकसित केल्याचा दावा केला होता. मात्र, तो प्रत्यक्षात Unitree Go2 नावाचा रोबोट असून तो Unitree Robotics या चिनी कंपनीने बनवलेला आहे, हे तज्ज्ञांनी स्पष्ट केले. व्हिडिओ व्हायरल होताच या प्रकाराने खळबळ उडाली. वाद वाढल्यानंतर विद्यापीठाने सुरुवातीला आपण असा दावा केलाच नव्हता, अशी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला; मात्र आयोजकांनी त्यांना स्टॉल काढून घेण्यास सांगितले. परिणामी, विद्यापीठाची नाचक्की झाली.

नवसंशोधन आणि नवोन्मेष या गोष्टी आजच्या शिक्षणात अत्यंत आवश्यक आहेत. परंतु केजीपासून पीएचडीपर्यंतचे शिक्षण अनेकदा 'कॉपी-पेस्ट' संस्कृतीकडे झुकताना दिसते. उत्तीर्णतेची केवळ कागदी पदवी मिळवण्याची चढाओढ लागली आहे. जे थोडेफार संशोधन आणि नवोन्मेष करून स्वतःची प्रतिभा उंचावण्याचा प्रयत्न करतात, त्यांना भारतात अपेक्षित संधी न मिळाल्याने परदेशात स्थायिक व्हावे लागते. सुंदर पिचाई, सत्या नाडेला, अरविंद कृष्णा, शंतनू नारायण यांसारख्या अनेक भारतीयांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठी कामगिरी बजावली आहे. त्यांच्या स्वतंत्र प्रज्ञेला तेथे योग्य वाव मिळाला.

शिक्षणाच्या बाजारीकरणामुळे अशा प्रकारांना खतपाणी मिळत आहे. अनेक शिक्षणसंस्था पैसा कमावण्याचे साधन बनत आहेत. पूर्वी विद्यार्थ्यांची कसून परीक्षा घेतली जात असे. विद्यार्थी रात्रंदिवस अभ्यास करून तयारी करत असत. आज मात्र तोंडी गुण, बनावट प्रात्यक्षिके आणि कॉपी-पेस्ट प्रकल्पांच्या आधारे अतिरिक्त गुण देऊन विद्यार्थ्यांना पुढे ढकलले जाते. त्यांनी सादर केलेली प्रात्यक्षिके खरी की खोटी, हे तपासण्यासाठी सक्षम यंत्रणा असणे अत्यावश्यक आहे. विशेषतः पीएचडीसाठी सादर होणारे प्रबंध मनन, चिंतन, वाचन, सर्जनशीलता आणि प्रत्यक्ष प्रयोगांवर आधारित आहेत का, याची काटेकोर पडताळणी झाली पाहिजे.

प्राथमिक शिक्षणापासूनच विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन, नवविचार आणि प्रयोगशीलता जोपासली पाहिजे. क्षेत्रभेटींना प्राधान्य दिले पाहिजे. शिक्षणाचा प्रत्यक्ष जीवनाशी संबंध जोडला गेला पाहिजे. केवळ पाठ्यपुस्तकापुरते शिक्षण मर्यादित न ठेवता पुस्तकाबाहेरील ज्ञान आत्मसात करण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. पर्यावरण संरक्षण, अंधश्रद्धा निर्मूलन, प्रौढ साक्षरता, प्रदूषण नियंत्रण, व्यसनमुक्ती, तंटामुक्त गाव, स्वच्छ सुंदर गाव, नैसर्गिक शेती अशा सामाजिक उपक्रमांशी विद्यार्थ्यांना जोडले पाहिजे. विविध विचारप्रणालींची ओळख करून देत वाचन-लेखनाची गोडी विद्यार्थीदशेतच लावली पाहिजे.

शिक्षण हे व्यक्तीच्या वैचारिक, सामाजिक, आर्थिक, नैतिक आणि राजकीय परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनुसार, शिक्षणातून येणारे शहाणपण समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी वापरले गेले पाहिजे. ते म्हणतात की, "लोकांना फसवण्यासाठीही बुद्धी आणि चातुर्य लागते". दुर्दैवाने, हीच बुद्धी काहीजण चुकीच्या मार्गाने वापरतात. त्यामुळे शिक्षण केवळ पदवीपुरते मर्यादित न राहता नैतिकतेची जाणीव निर्माण करणारे असले पाहिजे.

शेवटी, अधिक पैसा कमावणे हा शिक्षणाचा अंतिम उद्देश नसावा. मानवी जीवन अधिक सजग, सुसंस्कृत आणि सुखी व्हावे—हा शिक्षण व्यवस्थेचा मूलभूत हेतू असला पाहिजे. प्रामाणिकपणा, संशोधननिष्ठा आणि सामाजिक जबाबदारी यांवर आधारलेले शिक्षणच खऱ्या अर्थाने राष्ट्राला सक्षम बनवू शकते.



**- किशोर जाधव,सोलापूर**
मो. नं. ९९२२८८२५४१

# संगीतमय दुनियेवर अर्जित सिंगच्या आवाजाची जादू...!



काही दिवसापूर्वी सुप्रसिद्ध गायक अर्जित सिंग यांनी एका पोस्टद्वारे मध्ये आपल्या पार्श्वगायिकीपासून दूर जाण्याचा निर्णय घेतला. ही पोस्ट पाहताच अनेक लोकांनी आश्चर्य व्यक्त केले, आणि काही लोकांनी हा निर्णय बदलण्याचा प्रयत्न सुद्धा केला. अनेक वर्ष गायक आपल्या गायकीने लोकांचे मनोरंजन करत आहेत. परंतु, अर्जित सिंग या व्यक्तीमहत्त्वाच्या मागे गायीकी ही फक्त नाव रूपाला नाही आली, तर एका वेगळ्या दुनियेत जाणारे गायकी त्याने सगळ्यांसमोर सादर केली. तरुण मंडळी असो किंवा अगदी प्रौढ व्यक्ती असो सर्वांनाच भुरळ घालणारी गायकी त्यांनी या जगासमोर ठेवली. पूर्वी संगीत आणि गायनाचे सुंदर असे मनोमिलन ऐकायला मिळायचे. त्याचेच नवीन रूप अर्जित सिंग ने आपल्या कौशल्याने सर्वांसमोर सादर केले. पोस्ट पाहताच सर्वांना दुःख झाले आणि काहींना आश्चर्याचा धक्काही बसला. पण, जो निर्णय त्यांनी घेतलेला आहे तो नक्कीच विचारपूर्ण आणि त्याच्या वैयक्तिक आणि व्यवसायिक क्षेत्र साठी सुखद मार्गावर नेणारा असणार आहे. परंतु या सर्वांमध्ये रसिक लोक थोडे दुःखी झालेले पाहायला मिळतात. अगदी लहानशा गावांमध्ये साधेपणाने फिरणारा गायक म्हणून अर्जित सिंगची ओळख. पण त्याचप्रमाणे तरुणाईला अतिशय भुरळ घालणारी गायकी ज्याच्यामध्ये सुख-दुःखाचा मनोमिलन दिसून येतो. काही काळापूर्वी याच गायकाला नाकारण्यात आले होते प्रेम, दुःख आणि प्रेमभंग या गोष्टींचा विचार करत या गायकाने पूर्ण जगावर हिंदी गायके किंवा बरोबर इतरही भाषांवर प्रभुत्व गाजवत एक मोठा ठसा उमटवला. अगदी साधेपणाने आणि प्रेमळ असा स्वभाव असणारा अर्जित सिंग आपल्या गाण्यांमध्ये एक सुख दुःख, प्रेम, प्रेमभंग तसेच अनेक मनातील छटा आपल्या गायिकीच्या दृष्ट्या उमटवत गेला, याचा सर्वच रसिक जनतेने आपलेपणाने स्वीकार केला आहे. प्रत्येक गाण्यांमध्ये नाविन्यपूर्ण तसेच सर्वात महत्त्वाचे म्हणजे एक मनाची खोली ज्याला आपण मनाची गेहराई म्हणतो, हे त्यांनी अचूकपणे ओळखले आणि त्याच्या गायकीमध्ये ते दिसून येत आहे. अर्जित सिंगने फक्त पार्श्वसंगीत पार्श्वगायकी याच्यापासून संन्यास घेतला आहे, परंतु तो गात राहील अशी सर्वांना अपेक्षा आहे. अर्जित सिंगने फक्त भारतातच नव्हे तर पूर्ण जगामध्ये आपल्या गायीकीने कार्यक्रम केले आहेत. मोठ्या संख्येच्या लोकांसमोर गायकी करून त्याने अनेक शो-कार्यक्रम केले आणि भारतातच नव्हे तर इतर पाश्चात्य देशांमध्ये सुद्धा लोक त्याचे चाहते आहेत. प्रत्येक गायकीमध्ये जो तरंग, जो साज, जो आवाज, आणि जो भाव-भावना उतरवतो, त्यालाच आज अर्जित सिंग म्हणतात. गायक भरपूर येऊन गेले पण आजच्या पिढीला मनमोहक गायकीच्या द्वारे त्याने सर्वांचे मन जिंकले. रसिक लोक घरात, गाडीत, लांब जाताना, बस मध्ये, विमानात प्रत्येक प्रवासात तसेच अनेक मनोरंजनाच्या जागी जसे की एफ एम, टीव्ही, म्युझिक शो, थिएटर, कॉन्सर्ट या जागी अर्जित सिंग च्या व्यक्ती महत्त्वाचा छाप पडत गेला आहे. रसिक लोकांना विचारल्यावर ते म्हणतात की आमच्या भावना गायकीच्या मार्फत अर्जित सिंग सर्वांसमोर आणतो. याची गायकी प्रेमभंगावर मलम लावण्याचाही काम करते. असेही अनेक लोकांचे म्हणणे आहे. तर प्रेमात असणाऱ्या व्यक्तिमत्त्वाच्या अंतर्मनातील प्रेम उफाळून आणण्याचे काम सुद्धा याचे गायकी करत आहे. त्यामुळे फक्त तरुण वर्गच नाही तर अनेक स्त्री-पुरुष, तरुण-तरुणी, मित्र मैत्रिणी असे अनेक जोडपे याच्या गाण्याचा आस्वाद घेताना दिसून येतात. खरं सांगायचं तर वैयक्तिक दृष्ट्या मलाही त्याची गाणी भुरळ घालतात. कानाचा संगीताने मनापर्यंतचा प्रवास आणि भाव-भावना उतरवण्याचा प्रवास हा गायक अर्जित सिंग नक्कीच सुखद करत आहे. या गायकीमध्ये अनेक व्यक्ती महत्त्व गाऊन गेले, पण जी प्रसिद्धी आणि जो जलवा अर्जित सिंगचा आहे, तो कोणाच्याही मनात घर करून जाईल. कारण, त्याचे कर्म आणि कर्तव्य हेच डोळ्यासमोर ठेवून त्याने गायकी सोडली नाही. अनेक पराभवांना आणि अपयशाला पचवत अर्जित सिंग ने आपले नाव गायनाच्या दुनियेत कोरले आहे. अर्जित सिंग सारखा गायक आपल्याला लाभणे हे सर्व भारतीयांसाठी अभिमानास्पद गोष्टी आहे. अगदी जमिनीला जोडलेला माणूस म्हणून प्रसिद्ध असलेला अर्जित सिंग पुढेही गात राहील आणि रसिक मंडळींना मनोरंजन करत राहील, त्याचप्रमाणे गायनाशी प्रेम करणाऱ्या लोकांना तो नाविन्यपूर्ण दुनियेत घेऊन जाईल अशीच आशा इथे व्यक्त केली जात आहे. त्यामुळे अशा गायकाला हिरा म्हणणे काही गैर नाही आणि हा हिरा आपण जपून ठेवणे गरजेचे आहे एवढेच इथे सांगू इच्छितो.



**ऋत्विज चव्हाण**
मो : 8380800083

# सॅमसंग इंडियाचा AI स्मार्टफोन; प्री-आरक्षणावर विशेष फायदे

**दिल्ली (वृत्त सेवा):-** सॅमसंग, भारतातील सर्वात मोठा ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँड, आज त्याच्या आगामी अकस्मार्टफोनचे प्री-आरक्षित ग्राहकांसाठी विशेष फायदे जाहीर केले. प्री-रिझर्व्ह करणाऱ्या ग्राहकांना 256GB ते 512GB पर्यंत मोफत मेमरी अपग्रेड मिळेल.

सॅमसंगचा पुढील AI फोन 25 फेब्रुवारी रोजी सॅन फ्रान्सिस्को, कॅलिफोर्निया येथे गॅलेक्सी अनपॅक्ड इव्हेंटमध्ये अनावरण केला जाईल. ग्राहक 25 फेब्रुवारीपर्यंत INR 999 ची परत करण्यायोग्य टोकन रक्कम भरून नवीन Galaxy S मालिका डिव्हाइसेस पूर्व-आरक्षित करू शकतात. Samsung.com, Samsung Exclusive Stores, Amazon.in, Flipkart.com आणि भारतभरातील आघाडीच्या रिटेल आउटलेट्सद्वारे प्री-रिझर्वेशन उपलब्ध आहेत.

स्टोरेज अपग्रेड व्यतिरिक्त, प्री-आरक्षित ग्राहकांना नवीन Galaxy S मालिका डिव्हाइसेस खरेदी केल्यावर INR 2699 किमतीचे फायदे मिळतील. नवीन Galaxy S मालिका दैनंदिन परस्परसंवाद सुलभ करण्यासाठी, आत्मविश्वास वाढवण्यासाठी आणि Galaxy AI हातात असल्यापासून ते अखंडपणे एकत्रित करण्यासाठी डिझाइन केले आहे.

# मोहोळ-तांदूळवाडी मार्ग मंजुरीच्या अंतिम टप्प्यात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरासाठी बाह्यवळण मार्गास निधी मिळण्याची शक्यता धूसर झाली असताना, शहराच्या २५ किमी अंतरावरून नवीन बाह्यवळण रस्ता मंजूर होण्याच्या अंतिम टप्प्यात आहे. मोहोळ ते तांदूळवाडी या १०७ किमी लांबीच्या व १० मीटर रुंदीच्या नव्या मार्गाचा प्रस्ताव राष्ट्रीय महामार्ग विभागाने केंद्र शासनाकडे पाठवला आहे. प्रस्तावातील त्रुटीही दूर करण्यात आल्या असून, लवकरच या मार्गास मंजुरी मिळणार आहे. या मार्गामुळे सोलापूर शहरातून विजयपूरला, पुढे कर्नाटकात व विजयपूरहून सोलापूरमार्गे आंध्र प्रदेशात जाणारी वाहतूक या नवीन मार्गावरून होणार आहे.

सोलापूर शहरात येणारी जड वाहतूक रोखण्यासाठी बाह्यवळण मार्गाची मागणी होत होती. सध्या मुंबई, पुणेहून विजयपूरमार्गे कर्नाटकात जाणाऱ्या जड वाहनांना शिवाजीनगर येथून बाह्यवळण मार्ग उपलब्ध केला आहे. कर्नाटकातून येणारी जड वाहतूक याच मार्गाने मुंबई, पुण्याकडे जात आहे. मोहोळ ते तांदूळवाडी या नव्या मार्गामुळे हैदराबादहून कर्नाटकात व कर्नाटकातून हैदराबादमध्ये जाणाऱ्या जड वाहनांसाठी हा मार्ग पर्याय असणार आहे. आता मुंबई, पुण्यावरून हैदराबादकडे जाणाऱ्या मार्गांना फक्त शहरातून जावे लागत आहे. यासाठीही सुरत-चेन्नई यातून पर्यायी मार्गाचा विचार होण्याची दाट शक्यता आहे. पण अद्याप त्यावर राष्ट्रीय महामार्ग विभागाने कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही.

**असा राहणार मार्ग...**

मोहोळ ते तांदूळवाडी (ता. द. सोलापूर) असा १०७ किमीचा हा नवीन महामार्ग १० मीटर रुंद असणार आहे. हा महामार्ग मोहोळ, कुरुल, कामती, तैरा मैल, औराद, बंकलगी, कणबस, वळसंग, धोत्री, मुस्ती व तांदूळवाडी असा राहणार आहे. सध्या हा मार्ग काही ठिकाणी ५ तर काही ठिकाणी ७ मीटरचा आहे, तो पूर्णतः १० मीटरचा करण्यात येणार आहे.

**रुंदी वाढणार, भूसंपादनही करावे लागणार**

सध्या मोहोळ ते तांदूळवाडी हा १०७ किमी मार्ग अस्तित्वात आहे. पण रुंदी ही ५ ते ७ मीटर इतकी आहे. रुंदी वाढवण्यात येणार असल्याने नव्याने भूंसपादन करावे लागणार आहे. या मार्गावर नवीन पुलांची उभारणीही करण्यात येणार असल्याने अंदाजे ९०० कोटी रुपयांचा निधी लागणार आहे. केंद्र शासनाकडून मान्यता मिळताच पुढील कामे होणार आहेत.

# खा. शिंदे यांच्या खासदार निधीतून आष्टी येथे सभामंडप कामाचे भूमिपूजन



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर लोकसभा मतदारसंघ यांच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्या खासदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत मोहोळ तालुका येथील आष्टी गावातील गोपाळकृष्ण मंदिर येथे सभामंडप उभारणीसाठी १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. या निधीतून होणाऱ्या कामाचे भूमिपूजन खासदार प्रणिती शिंदे हस्ते व मान्यवर ग्रामस्थांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडले.

यावेळी सुलेमान तांबोळी (मोहोळ तालुका अध्यक्ष), राजेश पवार (जिल्हा उपाध्यक्ष), जिल्हा समन्वयक मनोज यलगुलवार, विजय सावंत, देवानंद गुंड पाटील, राजाभाऊ गुंड पाटील, जीवराज गुंड पाटील, मुकुंद तात्या गुंड पाटील, दत्तात्रय सावंत, बाळासाहेब पाटील, प्रमोद टाळकुठे, भगत सर, बभ्रुवहन कांबळे, बाबा गाडे, एस. जी. कोरबू, हभप रामचंद्र गुंड, अण्णासाहेब सावंत, सनी पाटील, सुहास जाधव, सुनील खडके, सुजित गुंड, दादा पवार यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

या सभामंडपाच्या उभारणीमुळे आष्टी गावातील धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होणार असून ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## वात्रटिका

### मातृत्वाचा बाजार

कशा कशाची चोरी होईल
कांहीच सांगता येत नाही...
गरिबी आणि अज्ञानाची बळी
बाई कुठंच सुरक्षित नाही...
स्त्रीबिजाची तस्करी करून
बदलापूरी नवीन फंडा आहे...
गरजवंत आणि गरीब हेरून
अज्ञानाला विज्ञानाचा गंडा आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

पान १ वरून

## मोहोळमध्ये स्थापन करण्यात...

तणाव मोठ्या प्रमाणात निवळला. मोहोळ मधील या महत्वपूर्ण परिस्थितीवर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद,पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी हे दिवसभर लक्ष ठेवून होते.

यावेळी जरी काही काळ तणावाचे वातावरण असले तरी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मोहोळ पोलीस आणि महसुल प्रशासनाने अभूतपूर्व संयम बाळगत पुतळा स्थापना करणाऱ्या विविध समाजाच्या बांधवांशी संवाद सुरू ठेवत ही परिस्थिती अत्यंत कौतुकास्पदरित्या हाताळली. हा पुतळा स्थापन केलेली जागा ज्या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण पंढरपूर उपविभागाच्या कार्यालयाच्या कक्षेत येते त्या पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे उपव्यवस्थापक मुकेश कुमार सिंह सचिन पवार राजेश कुमार सोनी यांना मोहोळमध्ये तात्काळ पाचारण करण्यात आले. घटनेची माहिती उपलब्ध होताच पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर, पोलीस निरीक्षक बाजीराव पवार, सपोनी. नितीन आतकरे सपोनी. किरण पाटील यांनी पुतळास्थळाच्या परिसरात येऊन सर्वांशी संवाद साधत शांततेचे आवाहन करत हि परिस्थिती कौशल्याने हाताळली.

मोहोळ शहर आणि तालुक्यातील सर्वपक्षीय पदाधिकारी सामाजिक क्षेत्रातील मान्यवर आणि सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पोलीस ठाण्यात या विषयावर शांततामय मार्गाने महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करत यामध्ये समन्वयात्मक तोडगा काढण्यात आल्याचे बैठकीतील काही समाज बांधवांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. सदर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूणार्कृती पुतळ्याला प्रशासकीय स्तरावरून त्वरीत परवानगी मिळण्यासाठीच्या प्रशासकीय प्रक्रियेला तात्काळ प्रारंभ करत असल्याचे नमुद करत सद्यस्थितीला आणि भविष्यातही सर्व शंभू प्रेमी युवक बांधव प्रशासनाला सर्वतोपरी सहकार्य करतील असे ठोस आश्वासन पुतळा स्थापन करणाऱ्या युवकांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिले.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# जिल्हा परिषदेच्या नव्या पदाधिकाऱ्यांकडून सादर होणार जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषदेत मागील चार वर्षापासून प्रशासक राज होते. त्यामुळे प्रशासनाकडून या काळात दरवर्षी अर्थसंकल्प सादर करण्यात येत होता. मात्र आता जिल्हा परिषद सदस्यांची निवड झाली आहे. त्यामुळे मार्च महिन्यात नव्या पदाधिकार्यांकडूनच नव्या आर्थिक वर्षातील बजेट समागृहात सादर करण्यात येणार आहे.

जिल्हा परिषदेचा दरवर्षी सुमारे ४५ ते ५० कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सभागृहात सादर करण्यात येतो. प्रशासकीय काळात अनेक लोकाभिमुख योजनांचा समावेश करण्यात आला नाही अशी ओरड ग्रामीण भागातून होत होती. आता जिल्हा परिषद सदस्यांकडून ग्रामीण भागातील नागरिकांसाठी आवश्यक योजना अर्थसंकल्पात सादर होतील अशी अपेक्षा नागरिकांतून व्यक्त होत आहे.

जिल्हा परिषदेच्या सार्वत्रिक निवडणूकीत जिल्हा परिषद सदस्यांची निवड करण्यात आली आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाच्या निवडी फेब्रुवारी अखेर पर्यंत होण्याची शक्यता आहे. त्यानंतर १५ मार्च पर्यंत जिल्हा परिषदेच्या सर्व सभापतींच्या निवडी होण्याची शक्यता आहे.

जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम समिती सभापतीकडून जिल्हा परिषदेच्या सभागृहात बजेट सादर करण्यात येतो. त्यामुळे मार्च अखेरपर्यंत नव्या अर्थ समितीच्या सभापतीकडून जिल्हा परिषदेचा बजेट सादर होणार आहे. हा बजेट कशा स्वरुपाचा असेल याकडे ग्रामीण भागातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात आतापर्यंत शिलाई मशीन, कडबाकुट्टी, ताडपत्री, पाणबुडी मोटार या सारख्या योजना घेण्यात आल्या आहेत. मात्र आता बदलत्या काळानुसार ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या गरजा बदलत आहेत. त्यामुळे बदलत्या तंत्रानुसार शेतकऱ्याच्या हितासाठी नवीन योजना बजेटमध्ये दिसतील अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात येत आहे.

**लॉटरी पध्दत होणार बंद**

जिल्हा परिषदेच्या डीबीटी योजनांसाठी प्रशासकीय काळात लाभार्थी निवडीकरीता लॉटरी प्रणालीचा अवलंब करण्यात आला. मात्र जिल्हा परिषद सदस्यांच्या निवडी झाल्याने सदस्यांच्या शिफारसीनुसार लाभार्थी निवड प्रक्रियेस नव्या आर्थिक वर्षापासून सुरुवात होण्याची शक्यता आहे.

# शिवजन्मोत्सवात आरती की विचारपूजन? शिवरायांच्या ‘दैवतीकरणा’वरून नवी चर्चा

**पुणे/मुंबई (कटूसत्य वृत्त) :-** शिवजन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्यात अनेक ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेसमोर पंचारती, कापूर-अगरबत्ती लावून पारंपरिक आरती करण्यात येत असल्याचे चित्र दिसत आहे. मात्र, या प्रथेमुळे शिवरायांचे ‘दैवतीकरण’ होऊन त्यांच्या कर्तृत्वाचा इतिहास झाकोळला जाईल, अशी तीव्र भूमिका काही सामाजिक कार्यकर्ते, इतिहासप्रेमी आणि विचारवंतांनी मांडली आहे. ‘शिवराय हे देव नव्हेत; ते स्वकर्तृत्वावर उभे राहिलेले महामानव आहेत,’ असे ठाम मत या गटाने व्यक्त केले आहे.



**‘चमत्कार नव्हे, कर्तृत्वाचे स्मरण व्हावे’**

सामाजिक कार्यकर्ते, इतिहासप्रेमी आणि विचारवंतांचे म्हणणे आहे की, आरती-पूजनाच्या वाढत्या प्रथेने भविष्यातील पिढ्यांपुढे शिवरायांची प्रतिमा ‘चमत्कारिक देव’ म्हणून उभी राहण्याचा धोका आहे. ‘एकदा दैवतीकरण झाले की, शिवरायांचा समग्र पराक्रम हा चमत्कारातून घडला, असे भोंदू प्रवृत्तीचे लोक सांगू लागतील. त्यामुळे त्यांच्या लढ्याची ऐतिहासिक, राजकीय आणि सामाजिक पार्श्वभूमी दुर्लक्षित राहील,’ असा इशारा त्यांनी दिला.

काही वर्षापूर्वी एका चित्रकाराने शिवरायांचे अनेक हात असलेले चित्र रेखाटून त्यांना देवतासदृश दाखवण्याचा प्रयत्न केला होता. त्या चित्राचे काही राजकीय नेत्यांनी कौतुक केल्याची चर्चा त्यावेळी रंगली होती. ‘अशा कृतींचा उद्देश काय?’ असा सवाल उपस्थित करत, शिवरायांना अलौकिक रूप देण्याऐवजी त्यांच्या विचारांचा आणि प्रशासनकौशल्याचा अभ्यास व्हावा, अशी मागणी होत आहे.

**‘महामानवांची परंपरा जपली पाहिजे’**

इतिहास अभ्यासकांच्या मते, शिवरायांनी मन, बुद्धी आणि मनगटाच्या बळावर स्वराज्य उभे केले. प्रतिकूल परिस्थितीत लढत, संघटनशक्ती, दूरदृष्टी आणि प्रशासनकौशल्याच्या जोरावर त्यांनी हिंदवी स्वराज्याची पायाभरणी केली. ‘दैवतीकरण केल्यास त्यांच्या मानवी संघर्षाची जाणीव कमी होते. शिवरायांचे मोठेपण त्यांच्या मानवी कर्तृत्वात आहे,’ असे मत व्यक्त करण्यात आले.

याच संदर्भात प्रबोधनकार ठाकरे यांचे वचनही चर्चेत आले आहे. त्यांच्या भाषेत, ‘३३ कोटी देवांची फलटणही शिवरायांच्या नावासमोर फिकी पडते,’ असे म्हणत, शिवरायांचे महत्त्व दैवी नव्हे तर ऐतिहासिक आणि मानवतावादी संदर्भात अधोरेखित केले गेले आहे.

**पर्याय म्हणून ‘जिजाऊ वंदना’ची मागणी**

आरतीऐवजी ‘जिजाऊ वंदना’ म्हणावी, अशीही सूचना करण्यात आली आहे. राजमाता जिजाबाई यांच्या संस्कारांमुळेच शिवरायांचे व्यक्तिमत्त्व घडले, असे सांगत मातृशक्तीचे स्मरण आणि विचारांचे पूजन करण्याचा आग्रह धरण्यात आला आहे. ‘भावनेच्या भरात पूजा-अर्चा करण्याऐवजी इतिहासाचे भान जपणे अधिक आवश्यक आहे,’ असे मत व्यक्त करण्यात आले.

**समाजात दोन प्रवाह**

या मुद्द्यावर समाजात दोन प्रवाह दिसून येत आहेत. एकीकडे आरती ही श्रद्धेची अभिव्यक्ती असून त्यात गैर काही नाही, असे मत व्यक्त केले जात आहे. तर दुसरीकडे, सार्वजनिक कार्यक्रमांतून दैवतीकरणाला प्रोत्साहन देणे योग्य नाही, असा युक्तिवाद केला जात आहे.

शिवजन्मोत्सव हा केवळ उत्सव नसून तो इतिहासाची जाणीव आणि स्वराज्याच्या मूल्यांचे स्मरण करण्याचा दिवस आहे. भविष्यातील पिढीसमोर आपण ‘चमत्कारिक देव’ नव्हे, तर जागतिक कीर्तीचे, महापराक्रमी आणि दूरदर्शी महापुरुष म्हणून शिवरायांची प्रतिमा उभी करावी, अशी अपेक्षा या चर्चेतून व्यक्त होत आहे.

‘जय जिजाऊ, जय शिवराय’ या घोषणेसह इतिहासाचे भान जपण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# लोकमंगल बँकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयंती उत्सव सोहळा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त लोकमंगल बँकेच्या मुख्य शाखेत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीची महापूजा बँकेचे अध्यक्ष तथा *आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते मोठ्या जल्लोषात संपन्न झाला.याप्रसंगी बँकेचे संचालक देवानंद चिलवंत,सिद्धार्थ सर्जे,जितेंद्र लाड - नाईक,बँकेचे मुख्यकार्यकारी अधिकारी राजेशसिंह बायस यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बँकेचे अध्यक्ष तथा आमदार सुभाष देशमुख यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने सर्वांना शुभेच्छा देताना छत्रपती शिवाजी महाराजांचे किमान एक तर गुण आपल्यामध्ये अंगीकृत



करून घ्यावा, शिवरायांचे विचार आपल्यामध्ये रुजूवावे तरच खरी शिवजयंती आपण साजरा केल्याचा आनंद आपल्याला होईल असे प्रतिपादन केले. याप्रसंगी संभाजी आरमारच्या शाही पालखी सोहळ्याचे पुष्पवृष्टी करून स्वागत व पालखी सोहळ्याचे पूजन बँकेच्या वतीने बँकेच्या प्रवेशद्वारासमोर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सर्व सहभागी शिवभक्तांना बँकेच्या वतीने सुगंधी दूध व पाणी बॉटलचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी शाही पालखी सोहळ्याच्या महापूजा दरम्यान संभाजी आरमार चे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत बापू डांगे व कार्याध्यक्ष तथा नगरसेवक शिवाजी तात्या वाघमोडे, प्रसिद्ध शिवव्याख्याते शिवरत्न शेटे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी बँकेचे अधिकारी व कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोलापूर मनपाकडून संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त अभिवादन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका यांच्या वतीने थोर समाजसुधारक संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त कौन्सिल हॉल येथील मा. महापौर कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सभागृह नेते नरेंद्र काळे, नगरसेवक विनोद भोसले, ज्ञानेश्वर म्याकल, प्रशांत पल्ली, सात्विक बडवे, नगरसेविका सौ. कल्पना कदम, सौ. राजश्रीताई दोडमणी, सौ. सारिका खजुरे तसेच नागेश खरात, अनिल कंदलगी, राहुल काटकर, अजय सोनटक्के, सुभाष गायकवाड, सचिन मस्के, अंकुश ननवरे, विजय वाघमारे, खंडू सोनटक्के, सागर गवळी, दत्तात्रय दळवी, महादेव काटकर आदी मान्यवर उपस्थित होते.

संत गाडगेबाबा यांच्या स्वच्छता, समाजजागृती आणि अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कायार्ची आठवण यावेळी उपस्थितांनी करून त्यांच्या विचारांनुसार कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# एस.टी. स्मार्ट कार्ड सेवेचा शुभारंभ



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवासात डिजिटल क्रांती घडविणाऱ्या ‘नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड’ (NCMC) आधारित एस.टी. स्मार्ट कार्ड सेवेचा शुभारंभ सोलापुरात उत्साहात पार पडला. रोख रकमेविना, सुरक्षित आणि सुलभ प्रवासाची सुविधा देणारा हा उपक्रम प्रवाशांसाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.या स्मार्ट कार्ड सेवेचा शुभारंभ महापौर विनायक कोंड्याल यांच्या शुभहस्ते करण्यात आला. कार्यक्रमास नगरसेवक विनोद भोसले, नगरसेवक प्रशांत पल्ली, विभागीय यंत्र अभियंता शितल बिराजदार परशुराम नकाते (विभागीय वाहतूक अधिकारी), नागेश जाधव (आगार व्यवस्थापक), सांख्यिकी अधिकारी कोलगे साहेब, स्थानक प्रमुख मल्लिनाथ अंजोटगी, वाहतूक निरीक्षक अक्षय वाघमारे, विनोद भोसले, एबिक्स कॅश चे सर्वेश घाडगे, महेश कस्तुरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

हे स्मार्ट कार्ड फ्ढ्ढ८ ढ्शीर्ख्रि प्लॅटिनम स्वरूपात उपलब्ध असून ठउटउ प्रणालीवर आधारित आहे. या कार्डच्या माध्यमातून एस.टी. प्रवास अधिक वेगवान, पारदर्शक व सुरक्षित होणार असून भविष्यात इतर डिजिटल व्यवहारांसाठीही याचा उपयोग करता येणार आहे. विशेषतः विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग प्रवासी व पत्रकार यांना या सुविधेचा लाभ होणार आहे.यावेळी बोलताना महापौर विनायक कोंड्याल यांनी सांगितले की, ‘डिजिटल व्यवहारांना चालना देत एस. टी. प्रवास अधिक आधुनिक करण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे. सोलापूर शहर डिजिटल परिवर्तनात अग्रेसर राहील.’ तसेच त्यांनी नागरिकांना आव्हान केले की, ‘सर्व एस.टी. प्रवाशांनी स्मार्ट कार्डचा जास्तीत जास्त वापर करून रोखविरहित व्यवहारांना प्रोत्साहन द्यावे आणि डिजिटल भारताच्या संकल्पनेला बळ द्यावे. ‘कार्यक्रमाचे आयोजन अभिष्री एंटरप्रायझेस अँड ट्रेडर्स, चे श्रीकांत सड्डू, संतोष चव्हाण, आदम बागवान यांच्या वतीने करण्यात आले. EBIXCASH व HJR Enterprises, मुंबई यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला.

# सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील साहित्य पुरस्कार वितरण समारंभ संपन्न



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शंकरनगर (ता.माळशिरस) येथे श्री विजय गणेशोत्सव मंडळ पब्लिक ट्रस्ट व मराठी साहित्य परिषद शाखा अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील साहित्य पुरस्कार वितरण समारंभात डॉ. जयसिंगराव पवार, डॉ.सदानंद देशमुख व कवी नारायण सुमंत यांना माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते पुरस्कार प्रदन करण्यात आले.

शंकरनगर येथील उदय सभागृहात संपन्न झालेल्या या साहित्य पुरस्कार वितरणाप्रसंगी अकलुज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील, आ.रणजितसिंह मोहिते-पाटील, सत्यप्रभादेवी मोहिते-पाटील, स्वरुपाराणी मोहिते- पाटील, नगराध्यक्षा रेश्मा अडगळे, विश्वतेजसिंह मोहिते-पाटील, विश्वस्त नितीन खराडे, चंद्रकांत कुंभार, डॉ.विश्वनाथ आवाड, श्रीकांत राऊत, राजेंद्र काकडे, शहेनाज शेख, वसुंधरा देवडीकर यांच्यासह साहित्यप्रेमी रसिक बहुसंख्येने उपस्थित होते.

प्रारंभी प्रास्ताविकात स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पुरस्कार प्राप्त साहित्यिकांचे परिचय करुन देत अकलुज कला,क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर आहे. साहित्य क्षेत्रात बिजारोपणासाठी साहित्य पुरस्कार प्रदानाच्या उद्देश असुन गेली ४ वर्षापासून साहित्त्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या साहित्यिकांचा सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील साहित्य पुरस्कारा देऊन गौरविण्यात येत असल्याचे सांगितले.

याप्रसंगी पुरस्कार प्राप्त नारायण सुमंत, डॉ.सदानंद देशमुख व डॉ. जयसिंगराव पवार यांच्या वतीने पुरस्कार स्विकारणाऱ्या आसावरी शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन विनायक सुर्यवंशी यांनी केले तर आभार रोहित देशमुख यांनी मानले.


## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

**-: संपर्क :-**

**8083608083**
**9922646566**
**8698732109**

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे. संपर्क 9145451809 भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केन्द्र


**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने** मो. 9353370779
**रेखा बर्वे** मो. 7218370779

### नावात बदल

माझे आधार कार्डवर नाव **प्राची औदुंबर शिंदे** राहणार निमगाव ता माढा जि सोलापूर असे आहे व लग्नानंतरचे नाव **प्राची अभिजीत जगताप** असे आहे वरील दोन्ही नावाची व्यक्ती एकच असून अन्य कोणीही नाही याची नोंद घ्यावी.


**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) लगेच उत्तर देणारा, वेळ न दवडता उत्तर देणारा २) धनी ३) सन उलट लिहा ४) सर्कशीतील विदूषक, पत्त्यातील एक पान ५) अंगावरील छोटा काळा ठिपका ६) पावा, मुरली ७) दुर्ग, किल्ला ८) महाराष्ट्रातील एक देशपातळीवरील नेते १२) लोकांचा समूह १३) हाताच्या चपळतेने फसविणे, ***** करणे १५) मोठे, उज्वल असे यश १६) एक रास २३) कमा उलट लिहा २५) राज्याचे माजी मुख्यमंत्री, सध्या केंद्रीय मंत्री- **** राणे २६) टीव्ही सिरीयल निर्माती-*** कपूर २७) याची धाव कुंपणापर्यंत अशी एक म्हण आहे २८) बे दुणे ३१) साईबाबांचा एक संदेश-*** मालिक एक ३२) लाकडाचे गोदाम ३३) मावशीचा मुलगा ३४) आ. नितेश राणे यांचा मतदारसंघ ३५) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ३७) तल्लीन, मग्न होणे ३९) जंगल, अरण्य ४३) एकाग्र, मग्न होणे ४४) एक अभिनेते-*** दामले ४६) फळातील गोड द्रव ४८) सूर्य (इंग्रजीत)

**आडवे शब्द :** १) श्रीरामाचा परमभक्त, वायुपुत्र ४) कोल्हापूर जिल्ह्यातील एक प्रसिध्द दैवत ७) श्री गजाननाचे एक नाव ९) लहान बाळाला ही टोचतात १०) मंदिराच्या शिखरावर हा बसवितात ११) परीट, धोबी १३) पराजय, जीतच्या विरूध्दार्थी १५) रांग १६) दम उलट लिहा १७) खर्चच्या विरूध्दार्थी १८) चार आणि तीन मिळून होणारी संख्या १९) आमीर खान अभिनीत एक चित्रपट-* इडियटस् २०) विश्वचषक (इंग्रजीत) २१) चाळीस आणि बारा मिळून होणारी संख्या २२) एक पेय, टी (मराठीत) २३) एक मराठी महिना २४) याच्यापासून शिरा बनवितात २५) गटर २६) सात गुणिले तीन २९) रक्षाबंधनवेळी बहीण भावाला बांधते ती ३०) एक जंगली हिंस्त्र पशु ३२) लग्नातील नवऱ्या मुलाची आई ३४) रांग, लाईन (हिंदीत) ३६) या कंपनीचे च्यवनप्राश प्रसिध्द आहे ३८) उन्हातान्हात भटकणे, **** फिरणे ४०) एक म्हण- दाम करी ** ४१) श्रीमंत (हिंदीत), शाहरूखचा एक हिंदी चित्रपट ४२) बनावट ४४) रयत, जनता, एक म्हण- जसा राजा तशी ** ४५) बोझा, वजन ४७) एक (इंग्रजीत) ४८) उत्सवाचा दिवस ४९) पर्जन्य ५०) निवडणुकीत उमेदवाराला मत देणे

## सुडोकु - 185

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | | | 5 | | 8 | | | 7 |
| | 8 | | 3 | | 2 | 9 | | 5 |
| | 5 | 4 | | | | | 8 | |
| | 7 | | 6 | 8 | | | 3 | 2 |
| 1 | | | | | 4 | | | 8 |
| 5 | | | 2 | 1 | 9 | | 6 | |
| | | | 9 | | 6 | | | 1 |
| 7 | 2 | 6 | | | 1 | | 4 | |
| | | 1 | 4 | 7 | | | 5 | 6 |

# मंगळवेढा तालुक्यात लिंगीरा ओढ्यात पाणी सोडले

## शेतकरी व पशुधनासाठी मोठा दिलासा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** खासदार प्रणिती शिंदे यांच्या मागणीमुळे, मंगळवेढा तालुक्यातील नागरिक, शेतकरी व पशुधनासाठी दिलासा देणारी महत्त्वाची कारवाई जलसंपदा विभागाकडून करण्यात आली आहे. तीव्र उन्हाळा आणि वाढती पाणीटंचाई लक्षात घेता, मंगळवेढा तालुका येथील उजनी उजवा कालवा (१०८ किमी) डोंगरगाव रङ्ढ मधून लिंगीरा ओढ्यात पाणी सोडण्यात आले आहे.

लिंगीरा ओढ्यावर अवलंबून असलेल्या अनेक शेतकऱ्यांना तसेच जनावरांना पिण्याच्या पाण्याची तीव्र कमतरता भासत होती. ओढ्यात पाणी नसल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.



ही गंभीर परिस्थिती ग्रामस्थांनी खासदार प्रणिती शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिली होती.

ऐन उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाई अधिक तीव्र होण्याची शक्यता लक्षात घेऊन, दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ रोजी खासदार प्रणिती शिंदे यांनी मा. अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग, सोलापूर यांच्याकडे निवेदन सादर करत तातडीने पाणी सोडण्याची मागणी केली होती. या निवेदनात उजनी उजवा कालवा (१०८ किमी) डोंगरगाव तालुका मंगळवेढा SKP मधून लिंगीरा ओढ्यावरील सिमेंट बंधारे भरण्यासाठी त्वरित पाणी सोडण्याची मागणी करण्यात आली होती. पाणी न सोडल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला.

या मागणीची तात्काळ दखल घेत जलसंपदा विभागाने संबंधित अधिकाऱ्यांना आदेश देत लिंगीरा ओढ्यात पाणी सोडण्याची कार्यवाही केली. पाणी सोडण्यात आल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना शेतीसाठी तसेच जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याचा मोठा दिलासा मिळाला असून, नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

उन्हाळ्यातील पाणीटंचाई दूर करण्याच्या दृष्टीने ही कारवाई अत्यंत महत्त्वाची ठरत असून, खासदार प्रणिती शिंदे यांच्या तत्पर पाठपुराव्यामुळेच ही समस्या मार्गी लागल्याची प्रतिक्रिया डॉ. नंदकिशोर शिंदे व स्थानिक ग्रामस्थांनी दिली आहे.

# नियोजन व्यवस्थित असेल तर संस्था चांगल्या चालतात- राजन पाटील

## श्रीकृष्ण पतसंस्थेचा पहिला वर्धापन दिन उत्साहात

**कुरुल (कटूसत्य वृत्त):-** कोणतीही संस्था काढणे सोपे असते, मात्र ती चालवणे फार कठीण. मात्र गरिबीतून पुढे आलेल्या प्रा. प्रमोद अवताडे यांनी ज्या संस्था उभ्या केल्या, त्या ठामपणे चालवून दाखवल्या. संस्थेतील कर्मचारी व्यवस्थित हाताळले. त्यामुळे भविष्यात देखील त्यांना चांगला स्कोप असून इथून पुढे सुरू केलेल्या संस्था चांगल्या व व्यवस्थितच चालवाव्या आणि नियोजन सूक्ष्म व काटेकोरपणे असेल तरच संस्था चांगल्या चालतात असे प्रतिपादन राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष तथा माजी आमदार राजन पाटील यांनी केले.

कामती बु. (ता. मोहोळ) येथील श्रीकृष्ण नागरी सहकारी



पतसंस्थेच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर चेअरमन प्रा. प्रमोद आवताडे, व्हाईस चेअरमन हनुमंत निकम, ज्येष्ठ नेते शिवानंद पाटील, रामराव भोसले-पाटील, बाबासाहेब क्षीरसागर, जालिंदर लांडे, दीपक माळी, नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्य अस्लम चौधरी, अंकुश आवताडे, जयसिंग अवताडे, पंडित निकम, बाबासाहेब जाधव, वैभव गुंड, माऊली जाधव, मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रा. प्रमोद अवताडे म्हणाले की, संघर्ष काय असतो हे मी अगदी जवळून पाहिले आहे. समाजामध्ये कसलीच पद नसताना मी नोकरीसाठी अनेक ठिकाणी फिरलो. आज विद्यार्थ्यांच्या आशीर्वादामुळे माझे व्यवसाय उद्योग भरभराटीला आले आहेत. त्यामुळे समाजात पत नसलेल्या माणसांची पत निर्माण करण्यासाठी, त्यांना आधार देण्यासाठी पतसंस्थेची स्थापना केली आहे. प्रत्येक ग्राहक हा आमच्यासाठी देव आहे. त्यामुळे ग्राहकांना कोणतीच अडचण न येण्यासाठी आम्ही सदैव कटिबद्ध असल्याचे सांगून राजन मालकांसारखे वडीलधारी नेतृत्व माज्या पाठीमागे आहे असे त्यांनी आवर्जून सांगितले.

दरम्यान, यावेळी पतसंस्थेतील ठेवीदारांना आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सचिन मिसाळ यांनी केले.

# अमोलराजे भोसले मित्र मंडळ यांच्या वतीने भव्य मिरवणूकीने शिवजन्मोत्सवाची सांगता





**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ आणि महाराष्ट्र बहुजन मध्यवर्ती शिवजन्मोत्सव युवक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आधारस्तंभ जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानाचे अध्यक्ष महेश इंगळे व मंडळाचे सुरेशचंद्र सूर्यवंशी, अन्नछत्र मंडळाचे सचिव- शामराव मोरे, बाबासाहेब निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली संयोजक अमोलराजे भोसले मित्र मंडळ यांच्या वतीने शनिवारी शिव छत्रपतींच्या भव्य मिरवणूकीने जय भवानी... ! जय शिवराय... !! च्या जयघोषात शिवजन्मोत्सवाची सांगता करण्यात आली. या मिरवणुकीत अमोलराजे भोसले मित्र मंडळाचे ८०० युवकांच्या लेझीम पथकाचा खेळ लक्षवेधी ठरले.. ! शिवप्रेमींनी प्रचंड गर्दी केली होती.

दरम्यान सायंकाळी ६ वा. शिव छत्रपतींची भव्य मिरवणूक आमदार सचिन कल्याणशेट्टी, सोलापूर जिल्हाप्रमुख- बाळासाहेबांची शिवसेना अमोलबापू शिंदे, नगरसेवक - सो. म.न.पा., राजन जाधव माजी सभापती परिवहन म.न.पा., सोलापूर, शहाजी पवार महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य भाजपा, जि.प.सदस्य शिवराज म्हेत्रे, प्रवीण तानवडे, नगरसेवक तम्मा शेळके, प्रवीण शहा, देविदास कवटगी, दिलीप सिद्धे, मोतीराम राठोड, शिवशरण जोजन, नन्नु लाला राठोड यांच्या हस्ते मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांची विधिवत पूजन अप्पू पुजारी व सोमकांत कुलकर्णी यांच्या मंत्र पटनाणे करण्यात आले. सदराची मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गावरील जुना राजवाडा समोरून कमलाराजे चौक, एवन चौक, नवा राजवाडा मार्गे, छ. शिवाजी महाराज चौक एस. टी. बसस्थानक, विजय कामगार चौक, कारंजा चौक, मेन रोड मार्गे, तूप चौक, फत्तेसिंह चौक ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे मिरवणुकीची सांगता करण्यात आली.

या मिरवणुकीस रामचंद्रराव घाटगे, अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष- अभय खोबरे, विश्वस्त चंद्रकांत भाऊ कापसे, कु. हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, प्रथमेश इंगळे, मैनुद्दीन कोरबू, सिद्धेश्वर मोरे, नन्नु कोरबू, सिद्धाराम टाके, शिवराज स्वामी, राम मातोळे, नागनाथ पाटील, पै. मौलाली शेख, बाळा शिंदे, यांच्या प्रमुख उपस्थितीत व सागर हिप्परगी, सोपानराव गोंडाळ, गणेश भोसले, मल्लिनाथ करपे, प्रा.भीमराव साठे, प्रा. सायबण्णा जाधव, प्रा.मनोज जगताप, शिवराज स्वामी, किरण जाधव, अनिल टोणपे, सिद्धेश्वर जाधव, विराज माणिकशेट्टी, संजय बडवे, बालाजी जाधव, श्रीशैल कुंभार, दिपक जरीपटके, दत्तात्रय बाबर, रुद्रय्या स्वामी, सातय्या स्वामी, सुनील खवळे, सायबण्णा हरवाळकर, ॲड. अनिल पाटील, रोहित खोबरे, पप्पू कोल्हे, चेतन जाधव, संतोष जाधव, सुनील पवार, सागर गोंडाळ, गोविंदराव शिंदे, रमेश शिंदे, महादेव बिराजदार, अश्पाकभाई कझी, किरण पाटील, बाळासाहेब घाटगे, रवी कदम, शिवा मंगरुळे, लक्ष्मण विभूते, चंद्रकांत कुंभार, ज्ञानेश्वर भोसले, संतोष माने, समर्थ घाटगे, ओंकार दुरुगकर, अभिषेक चव्हाण, लक्ष्मण शिंदे, शुभम कुलाल, अभिषेक सूर्यवंशी, केदार तोडकर, निखील शिंदे, अमित कोळी, विनायक भोसले, शरद भोसले, सुराज्य घाडगे, किरण साठे, युवराज सोनटक्के, दत्ता माने, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, अनिल बिराजदार, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर, शुभम चव्हाण, विठ्ठल रेड्डी शहरातील प्रमुख मार्गावरून मिरवणूक संपन्न झाली. निघालेल्या मिरवणुकीचे विविध सामाजिक संघटना व पक्षाने स्वागत केले. मिरवणूक यशस्वीसाठी अमोलराजे भोसले मित्र मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रकाश सुरवसे यांनी केले.

याप्रसंगी शिवजन्मोत्सव अध्यक्ष - आकाश शिंदे, उपाध्यक्ष - योगेश पवार, सचिव- सुमित घाटगे, श्रीधर गुरव, खजिनदार - शितल फुटाणे-जाधव तर कार्याध्यक्ष -विशाल कलबुर्गी, राजू पवार, फहिम पिरजादे, आकाश सूर्यवंशी मिरवणूक प्रमुख- संतोष भोसले, बाळासाहेब पोळ, प्रवीण घाडगे, निखील पाटील, गोटू माने, सनी सोनटक्के, सागर सोमवंशी लेझीम संघ व्यवस्थापक- वैभव मोरे, योगेश पवार, प्रथमेश पवार, मंगेश सूर्यवंशी, अमित घाटगे शिवजयंती स्टेज व मिरवणूक ट्रॉली सजावट प्रमुख- राहुल मोरे, वैभव कामनुरकर, समर्थ घाटगे, अनंत क्षीरसागर व्यवस्थापक- मनोज निकम, राजाभाऊ नवले, नितीन शिंदे, सौरभ मोरे, रोहित खोबरे, संजय गोंडाळ सत्कार प्रमुख- अशिष हुंबे, प्रशांत कडबगावकर प्रसिद्धी प्रमुख- प्रशांत भगरे, प्रवीण देशमुख, सोमशेखर जमशेट्टी, शंभूलिंग अकतनाळ, मिडिया प्रमुख अतिश पवार यांच्यासह आदिजन उपस्थित होते.

मिरवणुकीत सामील होणाऱ्या शिवभक्तांना विविध जणांनी मिरवणूक मार्गावर पाणी वाटप आले.

# शाळा गुणवत्ता मूल्यमापन योजनेत सिंहगड पब्लिक स्कूलला 'अ' प्लस श्रेणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा अंतर्गत केगाव येथील सिंहगड पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज या शैक्षणिक संस्थेला ह्यअह्ण प्लस श्रेणी प्राप्त झाली आहे. या उल्लेखनीय यशामुळे शाळेचा लौकिक सोलापूर जिल्ह्यासह राज्यस्तरावर उंचावला आहे. सोलापूरला रदअअऋ अंतर्गत अ+ श्रेणी लाभला आहे.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे सखोल बाह्य मूल्यमापन करण्यात आले. शैक्षणिक गुणवत्ता, अध्यापन पद्धती, विद्यार्थीकेंद्रित उपक्रम, शालेय व्यवस्थापन, पायाभूत सुविधा तसेच सहशालेय व क्रीडा उपक्रम या सर्व निकषांवर शाळेने उत्कृष्ट कामगिरी केल्याने तिला 'अ' प्लस श्रेणी बहाल करण्यात आली.

या यशामागे सावित्रीबाई फुले





शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव व सिंहगड शिक्षण संकुल, केगाव, सोलापूरचे संकुल संचालक संजय नवले यांचे कुशल मार्गदर्शन लाभले. तसेच शाळेच्या प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक यांच्या सामूहिक प्रयत्नांचे हे फलित आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षण, संस्कारमूल्ये आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास या उद्दिष्टाने कार्यरत असलेल्या शाळेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना या यशाने मोठी पावती मिळाली आहे.

या यशाबद्दल शिक्षण संचालक, शिक्षण विभाग, पुणे यांनी सिंहगड शिक्षण संस्थेचे अभिनंदन करत शाळेच्या गुणवत्तावर्धनाच्या सातत्यपूर्ण कार्याचे कौतुक केले आहे. तसेच सहसचिव व संकुल संचालक संजय नवले यांनी शाळेच्या सर्व घटकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या असून, भविष्यातही गुणवत्तावृद्धीसाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

दरम्यान, विद्यार्थ्यांच्या पालकांनीही या यशाबद्दल समाधान व्यक्त केले आहे. या यशामुळे परिसरातील शैक्षणिक क्षेत्रात सिंहगड पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेजचा मान अधिक उंचावला असून, संपूर्ण सोलापूर जिल्ह्यासाठी ही अभिमानाची बाब असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शाळा सदैव कटिबद्ध राहील, असे संजय नवले यांनी सांगितले.

# संस्कृती सातपुते यांचा ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीनं सत्कार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुक्यातील दहीगाव जिल्हा परिषद सदस्यपदी माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्या धर्मपत्नी सौ. संस्कृती सातपुते यांची बहुमताने निवड झाल्याबद्दल माळशिरस येथील श्री राम निवास येथे 'ईच्छा भगवंताची मित्रपरिवार'च्या वतीने त्यांचा उत्स्फूर्त सत्कार करण्यात आला. विजयाबद्दल आनंद व्यक्त करत कार्यकर्त्यांनी त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २२ चे भाजप नगरसेवक किसन जाधव, युवा नेते चेतन नागेश गायकवाड, उमेश जाधव, शरदराव शिंदे, माणिक कांबळे, यल्लप्पा शहापूरे तसेच मित्रपरिवारातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी पुष्पगुच्छ देत आणि घोषणाबाजी करत विजयाचा आनंद साजरा केला. यावेळी माजी आमदार राम सातपुते यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. किसन जाधव यांच्या हस्ते त्यांना टोपी, शाल आणि पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. कार्यकर्त्यांच्या उत्साहपूर्ण वातावरणात झालेल्या या सत्कार समारंभात सातपुते कुटुंबीयांविषयी अभिमान आणि विश्वास व्यक्त करण्यात आला. सौ. संस्कृती सातपुते यांनी मतदारांचे आभार मानत दहीगाव परिसराच्या विकासासाठी प्राधान्याने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. या विजयामुळे परिसरातील राजकीय वातावरणात नवचैतन्य निर्माण झाले असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# काकासाहेब थोबडे फाउंडेशनच्या वतीने कायदेविषयक कार्यक्रम उत्साहात संपन्न



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** काकासाहेब थोबडे फाउंडेशनच्या वतीने आयोजित कायदेविषयक कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात नवोदित वकिलांचा आकर्षक पद्धतीने सत्कार करण्यात आला असून सुमारे ४०० वकिलांची उपस्थिती लाभली.

ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. मिलिंद थोबडे यांनी 'प्रोफेशनल एथिक्स अँड सक्सेसफुल लीगल प्रॅक्टिस' या विषयावर सुमारे ७० मिनिटांचे प्रेरणादायी व्याख्यान दिले. या व्याख्यानातून मिळालेल्या मार्गदर्शनाची आणि नवोदित वकिलांना झालेल्या सन्मानाची सर्वत्र चर्चा रंगली. तसेच Bar Council of Maharashtra and Goa तर्फे सीनियर लॉयर सन्मान प्राप्त झाल्याबद्दल ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. विश्वनाथ आळंगे यांचा गौरव करण्यात आला.

ॲड. विश्वनाथ आळंगे यांनी मनोगत व्यक्त करताना ॲड. मिलिंद थोबडे यांच्या कार्याचे कौतुक करून पुरस्काराबद्दल आभार मानले.

कार्यक्रमाला Solapur Bar Associationचे अध्यक्ष ॲड. बाबासाहेब जाधव, सचिव बसवराज हिंगमिरे, सहसचिवा मीरा प्रसाद, खजिनदार अरविंद देडे तसेच ॲड. हिराचंद अंकलगी, ॲड. बसवराज सलगर, ॲड. राजेंद्र फताटे, ॲड. एम. डी. बिराजदार, ॲड. महादेव गोटे, ॲड. मिलिंद हरहरे, ॲड. दीक्षित, ॲड. उजळंबे, ॲड. अजय रणश्रृंगारे, ॲड. रवी सरवदे, ॲड. जालादी, ॲड. पी. बी. गायकवाड, ॲड. आर. एस. पाटील, ॲड. मल्लिनाथ पाटील, माजी सहसचिव ॲड. निदा सैफन व माजी सहसचिवा अल्का मोरे यांची उपस्थिती लाभली.

प्रास्ताविक ॲड. रितेश थोबडे यांनी केले. सूत्रसंचालन ॲड. मनोज पामुल व ॲड. शरद पाटील यांनी केले. नवोदित वकिलांच्या वतीने ॲड. अभिषेक गायकवाड व ॲड. विनायक हरहरे यांनी आभार व्यक्त केले. त्यांनी व्याख्यान हे वकिली व्यवसायातील मूल्ये, नैतिकता आणि यशाची दिशा स्पष्ट करणारे दीपस्तंभ ठरल्याची भावना व्यक्त केली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ॲड. श्रीप्रसाद अंकलगी यांनी केले.

# ड्रेनेज समस्याची तक्रार प्राप्त होताच उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी केली पाहणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राणा प्रताप नगर परिसरात गंभीर ड्रेनेज समस्या निर्माण झाल्याची तक्रार प्राप्त होताच उपमहापौर ज्ञानेश्वरी महेश देवकर यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

परिसरात सांडपाणी साचल्यामुळे दुर्गंधी पसरत असून नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत उपमहापौरांनी संबंधित महापालिका अधिकाऱ्यांना घटनास्थळी बोलावून ड्रेनेज लाईनची तात्काळ दुरुस्ती करण्याचे स्पष्ट आदेश दिले.



'नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही. काम तातडीने पूर्ण करून अहवाल सादर करावा,' असे ठाम निर्देश त्यांनी दिले. यावेळी सभागृहनेते नरेंद्र काळे, नगरसेवक राजशेखर पाटील, नगरसेवक सत्यजित वाघमोडे, अक्षय वाकसे, भारतीय जनता पार्टी मंडल अध्यक्ष महेश देवकर, उप अभियंता रामचंद्र पेंटर, विभागीय अधिकारी तळीखेडे तसेच कनिष्ठ अभियंता सेफाली मॅडम, ढवळे जेई उपस्थित होते.

राणा प्रताप नगरमधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या समस्या मांडल्या. उपमहापौरांनी अधिकाऱ्यांना तत्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्यानंतर स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले व लवकरच समस्या मार्गी लागेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयात मृदा व जल परिक्षण जनजागृती

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराअंतर्गत मौजे रानमसले ता. उत्तर सोलापूर येथील ग्रामपंचायतीच्या मुख्य व्यासपीठावर मृदा व पाणी परिक्षण महत्व याविषयी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे व व्याख्याते म्हणून प्रा. बाबाजी सिरसट (लोकमंगल कृषी महाविद्यालय, वडाळा, सोलापूर) हे लाभले होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्ती पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. याप्रसंगी रानमसले गावचे सरपंच मनोहर क्षिरसागर, उपसरपंच रमेश सुतार, ज्येष्ठ पत्रकार प्रवीण कुलकर्णी, ग्रामस्थ दशरथ गरड, लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्रा. वर्षा मानेदेशमुख, प्रा. अपूर्वा पिस्के, प्रा. आशिष सरकाळे, रोसयो स्वयंसेवक, रानमसले



गावातील सर्व ग्रामस्थ, जि. प. प्रा. शाळेतील सर्व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. यानंतर प्रमुख पाहुण्यांचा सत्कार प्रा. आशिष सरकाळे यांच्या हस्ते शाल देऊन करण्यात आला.

त्यानंतर प्रमुख पाहुणे प्रा. बाबाजी सिरसट यांनी मृदा व पाणी परिक्षण महत्व याविषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. माती व पाणी या दोन मुख्य घटकांवर शेतीची गुणवत्ता व सुपीकता अवलंबून असते. रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे मातीतील सेंद्रीय कर्ब वाढवणाऱ्या उपयुक्त जीवाणूंचा ऱ्हास होउन मातीचे आरोग्य व सुपीकता कमी होत चालली आहे. मातीची सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या शेतात रासायनिक खतांचा समतोल वापर करून सेंद्रिय खतांच्या वापर वाढविला पाहिजे. माती परिक्षणामुळे आपणास जमिनीतील नत्र, स्फुरद, पालाश व इतर सुक्ष्म अन्नद्रव्यांचे प्रमाण समजते व त्यानुसार सेंद्रीय खतांबरोबर रासायनिक खतांचा समतोल वापर कसा करावा याविषयी ठरविता येते. माती बरोबरच पाणी परिक्षण करणे खुप महत्वाचे आहे. विहिरीतील व बोअरवेलमधील अतिक्षारयुक्त पाणी शेतीसाठी वापरल्यामुळे मातीतल्या क्षारांचे प्रमाण वाढत जाऊन जमिनी क्षारपट होत चालल्या आहेत. अतिक्षारयुक्त जमिनीत रासायनिक खतांचा अतिरिक्त वापर केल्याने त्यातील नत्राची क्षारांससोबत रासायनिक क्रिया होऊन मातीतले पिकांसाठी हानीकारक चुनखडीचे प्रमाण वाढते व रासायनिक खतातील नत्र पिकांना लागु न होता ते वाया जाते. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या शेतीला दिल्या जाणाऱ्या पाण्याचे परिक्षण करणे आवश्यक आहे. असा मोलाचा सल्ला त्यांनी उपस्थित शेतकऱ्यांना दिला.

शेतकऱ्यांनी विविध विषयांवर त्यांच्याशी चर्चा करून आपल्या शंकांचे निरीक्षण करून घेतले. स्वयंसेवक सानिका यादव यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची गारद सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. त्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरतीने कार्यक्रमाची सांगता झाली.

याप्रसंगी रानमसले गावातील सर्व ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. या व्याख्यानाचे सूत्रसंचालन सावरी बिराजदार व भक्ती बिडवे यांनी व आभारप्रदर्शन सानिका यादव यांनी व्यक्त केले. या व्याख्यानासाठी सर्व स्वयंसेवकांचे व रानमसलेतील सर्व ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले.